माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ८७३/२०२२**

**अपिलार्थी—श्री. उमेश गोंडू भारशंकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**राणी दुर्गावती विद्यालय, आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद गडचिरोली, ता.जि. गडचिरोली**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०५.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधीकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०८.२०२१ | १३.०८.२०२१ | ३०.०८.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.०२.०८.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "१) आपले कार्यालयीन पत्र क्र. रा.क्र.वि.आ./५८/२०२१, दि. ०३.०७.०२१ च्या पत्राचे अवलोकन केले असता, शाळा सुधार फंडाच्या रुपाने कोणतेही अनुदान प्राप्त झालेले नाही असे कळविण्यात आले. तर शासनाकडून आपल्या शाळेकरीता दि. जानेवारी २०१५ पासून आजपर्यंत कोणकोणत्या रुपाने रक्कम पुरविण्यात आली. त्या त्या रक्कमेबद्दलची अद्ययावत माहितीच्या छायांकित प्रती २) पाठविलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीचे अवलोकन केल्यास जमाखर्च जुळने अनिवार्य आहे, अशी माहिती पुरवावी" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "आपण मागितलेल्या माहितीमध्ये कोणत्या अनुदानाच्या रक्कमेची माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख नसल्या कारणाने आपला अर्ज नस्तीबध्द (खारीज) करण्यात येत आहे", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. ३०.०८.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती पुरविण्यास टाळाटाळ" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.११.२०२१ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे आढळून येते. परंतु प्रत्यक्षात सुनावणी घेण्यात आलेली नाही. त्यानंतर प्रथम अपिलीय

अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. गडचिरोली यांनी दिनांक 11.10.2021 रोजीच्या पत्रान्वये, विद्यालयाचे स्तरावर अपिलीय अधिकारी मुख्याध्यापक असल्याने या कार्यालयास प्राप्त अर्जाची प्रत आपल्या कार्यालयास वर्ग करण्यात येत आहे. करीता संबंधित अर्जदाराची आपले समक्ष कार्यालयास सुनावणी ठेवून, अर्जदारास आवश्यक माहिती पुरविण्यात यावी व त्यानुसार कार्यवृत्त तयार करुन सुनावणीतील निर्णयाबाबत अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा, असे मुख्याध्यापक, राणी दुर्गावती विद्यालय आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली यांना कळविण्यात आले व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दि. २२.०३.२०२२ रोजी "माहिती अप्राप्त" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. २४.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. आज दि. ०६.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राणी दुर्गावती विद्यालय, आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली, श्री. गजानन लोनबले ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली, यांचेतर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. विश्वनाथ दुधबढे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, मागितलेल्या माहितीमध्ये कोणत्या अनुदानाच्या रक्कमेची माहिती हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख नसल्या कारणाने अर्ज नस्तीबध्द (खारीज) करण्यात येत आहे", असे अपिलार्थीस कळविले. परंतु जोडपत्र-अ मध्ये नमूद शाळेला शासनाकडून प्राप्त व इतर सर्व प्रकारचे अनुदानाची माहिती मागितलेली असून याबाबत शासनाकडून प्राप्त अनुदानाच्या रक्कमेच्या माहिती संबंधात कार्यालयीन अभिलेखावर कलम 2(च) प्रमाणे उपलब्ध असलेली व देय असलेल्या माहितीचा एक संच अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०६.०५.२०२४**

जावक क्रमांक E808 दिनांक 26 AUG 2024

M-2024/873-2022/भारशंकर